# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## गुरूवार, दि. २३ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये झालेले निर्णय.

| विषय | निर्णय |
|---|---|
| ०१ प्रव-अ-०१/२३०१२५<br>मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. २६.१२.२०२४ रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | म : ०१/२३०१२५<br>इतिवृत्त दुरुस्त्यांसह वाचून कायम करण्यात आले. |
| ०२ प्रव-अ-०२/२३०१२५<br>मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. २२.११.२०२४ रोजीच्या सभेमधील निर्णयांवरील कार्यवाहीबाबत. | म : ०२/२३०१२५<br>विद्यापीठ कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मान्यतेसह नोंद घेण्यात आली. |
| ०३ प्रव-अ-०३/२३०१२५<br>'प्रशिक्षित परिचारिका (Trained Nurse)' हे पद विद्यापीठ निधीतून निर्माण करण्याबाबत. | म : ०३/२३०१२५<br>आरोग्य केंद्राकरिता प्रशिक्षित परिचारिका **(Trained Nurse)** हे पद सहाव्या वेतन आयोगातील रु.९३००-३४८००, ग्रेड पे ४३०० या वेतनश्रेणीमध्ये विद्यापीठ निधीतून पाच वर्षे कालावधीसाठी निर्माण करण्यात येऊन प्रथमतः एक वर्ष मुदतीकरीता व गोपनिय अहवाल विचारात घेऊन उर्वरीत चार वर्षे कालावधिकरीता विहीत पध्दतीने भरण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता. |
| ०४ प्रव-अ-०४/२३०१२५<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारामध्ये उपकेंद्राकरीता देण्यात आलेल्या जागेचा MoU करून जागा वापरासंबंधी भाडे आकारण्यास मान्यता मिळणेबाबत. | म : ०४/२३०१२५<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारामध्ये उपकेंद्राकरीता उपलब्ध करून दिलेल्या जागेच्या वापरासंबंधीचा भाडे आकारणीबाबत घठित समितीच्या अहवालास, त्याचप्रमाणे समितीने शिफारस केल्याप्रमाणे प्रत्यक्ष ताबा दिल्याच्या दिनांकापासून पुढे दहा वर्षे कालावधीसाठी **MoU**/भाडेकराराच्या मसुद्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड यांना एकूण ८२४.१२ चौ. मीटर जागेच्या वापरासाठी प्रथम वर्षासाठी दरमहा रु. ५,००,०००/- (जीएसटी विरहित) व रु. ५,९०,०००/- (जीएसटी सहित) इतकी भाडे आकारणी, तसेच वर्षअखेरीस असलेल्या भाडे आकारणीच्या रकमेवर दरवर्षी १०% भाडेवाढ करण्यात यावी. सदर जागेचा वीज आकार, दैनंदिन देखभाल, दुरुस्त्या, स्वच्छता, इ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड यांचेमार्फत करण्यात यावी. |

| | |
|---|---|
| ०५ प्रव-अ-०५/२३०१२५<br>सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०० (५) (ग) नुसार बांधकाम समितीची सभा दि. १२.०९.२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बांधकाम समितीच्या सभेमध्ये करण्यात आलेले खंड-१ मधील ठराव क्र. ब-१(१)/२४-२५ ते ब-३(११)/२४-२५, ठराव क्र. ब-५(१)/२४-२५, ठराव क्र. ब-६(१)/२४-२५ ते ब-६(९)/२४-२५, ठराव क्र. ब-७(३)/२४-२५, ब-७(११)/२४-२५ व ठराव क्र. ब-९/२४-२५ इतिवृत्तासह प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सविनय सादर. | म : ०५/२३०१२५<br>सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात यावा. |
| ०६ प्रव-अ-०६/२३०१२५<br>'डॉ. देवाप्रसाद हनगल मेमोरियल (अवॉर्ड) पारितोषिक' खंडित करून 'डॉ. देवाप्रसाद हनगल मेमोरियल स्कॉलरशिप' विभाग स्तरावर नव्याने प्रस्थापित करणेबाबत. | म : ०६/२३०१२५<br>'डॉ. देवाप्रसाद हनगल मेमोरियल (अवॉर्ड) पारितोषिक' खंडित करून 'डॉ. देवाप्रसाद हनगल मेमोरियल स्कॉलरशिप' विभागस्तरावर नव्याने प्रस्थापित करण्यासाठीच्या नियम व अटींस मान्यता देण्यात येत आहे. |
| ०७ प्रव-अ-०७/२३०१२५<br>'कै.नानी ए. पालखीवाला सुवर्णपदक' खंडित करून 'कै.नानी ए. पालखीवाला पारितोषिक' नव्याने प्रस्थापित करणेबाबत. | म : ०७/२३०१२५<br>नानी ए. पालखीवाला मेमोरियल ट्रस्टच्या दिनांक १६/१०/२०२४ रोजीच्या पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे 'कै.नानी ए. पालखीवाला सुवर्णपदक' सन २०२३-२४ पासून खंडीत करून त्याऐवजी सन २०२४-२५ पासून रु.२५०००/- या रक्कमेचे रोख 'कै.नानी ए. पालखीवाला पारितोषिक' एलएल.एम. परिक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस देण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ०८ प्रव-अ-०८/२३०१२५<br>विद्यापीठ आवारात सुरु असलेल्या डॉ. डी. वाय. पाटील दंत वैद्यकीय महाविद्यालय आणि हॉस्पिटल पिंपरी या दंतचिकित्सा संस्थेशी करण्यात आलेल्या वार्षिक करारनाम्याचे नूतनीकरण करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | म : ०८/२३०१२५<br>आरोग्य केंद्रातील डॉ. डी. वाय. पाटील दंत वैद्यकीय महाविद्यालय आणि हॉस्पिटल पिंपरी या संस्थेशी करण्यात आलेल्या वार्षिक करारनाम्याचे नूतनीकरण करुन त्यांना वार्षिक (१ वर्ष) मुदतवाढ देण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. |
| ०९ प्रव-अ-०९/२३०१२५<br>परीक्षांच्या उत्तरपत्रिकेच्या स्कॅनप्रती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी ऑक्टों/नोव्हें २०२४ व एप्रिल/मे २०२५ या सत्रासाठी येणाया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | म : ०९/२३०१२५<br>सदरचा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात यावा. |
| १० प्रव-अ-१०/२३०१२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १०८(१)(क) व (१)(ज) आणि सन २०१९ चे एकरूप परिनियम क्रमांक १ मधील खंड (२)(१) आणि खंड (२)(१०) मधील तरतुदीचे अनुपालन न केल्यामुळे संबंधित महाविद्यालय व संस्था यांच्याबाबत सन २०१८ चे एकरूप परिनियम क्रमांक १ कलम (३) अन्वये विहित केलेली कोणतीही किंवा सर्व शास्ती आणि द्रव्यदंड लादण्यास गठीत समितीने शिफारस केलेबाबत. | म : १०/२३०१२५<br>महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या आबेदा इनामदार सिनियर कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १०८ (१) (क) व (१) (ज) आणि सन २०१९ चे एकरूप परिनियम क्रमांक १ मधील खंड (२) (१) आणि खंड (२) (१०) मधील तरतुदीचे अनुपालन न केल्यामुळे संबंधित महाविद्यालय व संस्था यांच्याबाबत सन २०१८ चे एकरूप परिनियम क्रमांक १ कलम (३) अन्वये विहित केलेली मुद्दा क्र. ३ (२) अन्वये रक्कम रु. १० लाख इतकी शास्ती लादण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>या परिनियमातील शास्ती लादणे याचा कोणत्याही प्रसंगी कसूरदार महाविद्यालयाने/मान्यताप्राप्त परिसंस्थेने किंवा, यथास्थिती, त्यांच्या व्यवस्थापनाने केलेली अनियमितता नियमित झालेली आहे किंवा माफ करण्यात आली आहे, असा अर्थ ध्वनित होत नाही असे संबंधित महाविद्यालय व |

<table>
<tr><td></td><td>महाविद्यालयाच्या व्यवस्थापनेस कळविण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>महाविद्यालयाने सदरील आदेश प्राप्त झाल्याच्या १५ दिवसांच्या आत आदेशाची अंमलबजावणी न केल्यास महाविद्यालयाची संलग्नता काढून घेण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>११ प्रव-अ-११/२३०१२५<br>मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेच्या विद्यार्थ्यांकरिता स्थानांतर व बोनाफाईड प्रमाणपत्र देण्याच्या सुधारित कार्यपध्दतीस मान्यता देण्याबाबत.</td><td>म : ११/२३०१२५<br>मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेच्या विद्यार्थ्यांकरिता स्थानांतर व बोनाफाईड प्रमाणपत्र देण्याच्या सुधारित कार्यपध्दतीस व स्थानांतर प्रमाणपत्रासाठी रु.२५०/- व बोनाफाईड प्रमाणपत्रासाठी रु.१५०/- इतके सुधारित शुल्क आकारणीस मान्यता देण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>१२ प्रव-अ-१२/२३०१२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरूप परिनियम, २०१८ मधील मुद्दा क्र. २(९) व (१०) मध्ये नमूद शर्तीचा भंग केला असल्याने, सदर एकरूप परिनियमानुसार चौधरी अत्तरसिंग यादव मेमोरियल एज्युकेशन ट्रस्टचे सिध्दांत इन्स्टिट्युट ऑफ कॉम्युटर ॲप्लीकेशन, सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे ४१२१०९ या महाविद्यालयावर शिस्तभंगाची कारवाई करणेबाबत.</td><td>म : १२/२३०१२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरूप परिनियम, २०१८ मधील मुद्दा क्र. ४ (३) अन्वये चौधरी अत्तरसिंग यादव मेमोरियल एज्युकेशन ट्रस्टचे सिध्दांत इन्स्टिट्युट ऑफ कॉम्युटर ॲप्लीकेशन, सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे ४१२१०९ विरूध्द प्रा. अश्विन भागवत तोमर या प्रकरणाची (तक्रार निवारण समिती प्रकरण ६६/२०२०) चौकशी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात येत आहे.<br>अ.क्र. सदस्याचे नाव<br>१. डॉ. राजेंद्र एकनाथराव विखेपाटील<br>२. श्रीमती. (डॉ.) ज्योत्स्ना गजानन एकबोटे<br>३. श्रीमती. (डॉ.) संगीता विजय जगताप<br>४. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग संलग्नता कक्ष (सदस्य सचिव)</td></tr>
<tr><td>१३ प्रव-अ-१३/२३०१२५<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून विविध अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद (Progressive Closure) करण्यासाठी आलेल्या अर्जावरील/प्रस्तावावर चौकशी समितीच्या अहवालाचा विचार करणे.</td><td>म : १३/२३०१२५<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून खालील तक्त्यांमधील महाविद्यालयांतील अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद (Progressive Closure) करणेसंदर्भात वित्त विभाग, परीक्षा विभाग, अंतर्गत गुणवत्ता व सिध्दता कक्ष, विद्यार्थी विकास मंडळ व नियोजन व विकास विभाग यांचेकडून काही हरकत आहे किंवा कसे तसेच संबंधित महाविद्यालयाचे/ मान्यताप्राप्त परिसंस्थेचे/अभ्यासक्रमांचे विद्यार्थी/परीक्षार्थी बाकी आहेत किंवा कसे त्याचप्रमाणे सदरहू महाविद्यालयाकडून संस्थेकडून काही येणे आहे किंवा कसे याबाबतची माहिती मिळविण्याच्या अधिन राहून ‘ना हरकत प्रमाणपत्र’ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
<table>
<tr><th>अ क्र</th><th>महाविद्यालयाचे नांव व युनिपुणे आयडी</th><th>शैक्षणिक वर्ष</th><th>बंद करावयाचे अभ्यासक्रम</th></tr>
<tr><td>१</td><td>पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे - ४११०४४ (CAAP010860)</td><td>२०२४-२०२५</td><td>विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा -<br>१) मास्टर ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लिकेशन (एम.सी.ए.) (सायन्स)<br>२) बी. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स</td></tr>
</table></td></tr>
</table>

<table>
<tr><td></td><td><table>
<tr><td></td><td></td><td></td><td>३) बी. एस्सी. मायकोबायोलॉजी (सायन्स)</td></tr>
<tr><td>२</td><td>महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वायत्त), कर्वे पथ, डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४ (CAAP010130)</td><td>२०२४-२०२५</td><td>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा -<br>१) मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एम.सी.ए.) (कॉमर्स)</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>१४ प्रव-अ-१४/२३०१२५<br>विद्यापीठ परिपत्रक क्र.३१६/२०२४, जा.क्र.एएन/५४१६, दि.३०/१२/२०२४ बाबत प्राप्त झालेली पत्रे/निवेदने/ईमेल इत्यादी.</td><td>म : १४/२३०१२५<br>सदरील प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात यावा.</td></tr>
<tr><td>१५ प्रव-अ-१५/२३०१२५<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विद्यापीठ हिस्सा (प्रो-रेटा) विलंब शुल्क आकारुन ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याच्या मुदतवाढीबाबत.</td><td>म : १५/२३०१२५<br>ज्या महाविद्यालयांनी विहित मुदतीत विद्यापीठ हिस्सा (प्रो-रेटा) भरला नाही अशा महाविद्यालयांकडून प्रति विद्यार्थी रु. ५०/- इतके विलंब शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>१६ प्रव-अ-१६/२३०१२५<br>प्राचार्य पदाच्या अतिरिक्त कार्यभारास मान्यता देणेबाबत.</td><td>म : १६/२३०१२५<br>ज्या अनुदानीत संस्था/महाविद्यालयांना शासनाकडून नियमित प्राचार्य पद भरणेकामी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे किंवा ज्या महाविद्यालयांनी प्राचार्य पद भरणेकामी शासनाकडे ना हरकत प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. अशा महाविद्यालयांना दिनांक ३१ जुलै, २०२५ पर्यंत किंवा प्राचार्य पदाची रितसर नेमणूक होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीसाठी प्रभारी प्राचार्य पदाच्या नेमणूकीस मान्यता देण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>०१ प्रव-क-०१/२३०१२५<br>विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, यांचेकडून प्रदान करण्यात आलेल्या स्वायत्त दर्जास मान्यता/मुदतवाढ मिळणेबाबत.</td><td>म : १७/२३०१२५<br>मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्यावतीने घेतलेल्या निर्णयाची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>०२ प्रव-क-०२/२३०१२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील प्रकरण १२ कलम १३४(७) अन्वये केलेल्या गुंतवणुकींबाबत.</td><td>म : १८/२३०१२५<br>दि. ३१/१२/२०२४ अखेर विद्यापीठाच्या उपरोक्त खात्यांमधून प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे केलेल्या गुंतवणूकीस मा. कुलगुरु यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्यावतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेऊन त्यास मान्यता देण्यात येत आहे.</td></tr>
</table>

(प्रा (डॉ.) ज्योती भाकरे)
मा. प्रभारी कुलसचिव
सचिव

(प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी)
मा. कुलगुरु
अध्यक्ष